**MHNG160000392024**

दाखल दिनांक – ०४.०१.२०२४
नोंद दिनांक – ०४.०१.२०२४
निकाल दिनांक – ०६.०५.२०२६
कालावधी – वर्ष महिने दिवस
०२ ०४ ०२

**मौदा येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय, मौदा**

( पिठासीन अधिकारी एन.के. वानखडे )

**सं.फौ.ख. क्र.२१/२०२४**
**निशाणी क्र.२३.**
[गुन्हा रजि. क्र. ३२०/२०२३
अरोली पोलिस ठाणे, जि. नागपूर]

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलिस ठाणे अधिकारी,<br>अरोली पोलिस ठाणे, ता. मौदा, जि. नागपूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | **श्री. एस. जी. इंगळे**, सहा. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | **रत्नमाला पुनमचंद शिंगाडे,**<br>व.व. ६५, धंदा – मजुरी,<br>रा. कोदामेंढी, ता. मौदा, जि. नागपूर. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्री. ए. एस. रेवतकर |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २७.०९.२०२३ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २७.०९.२०२३ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | ०४.०१.२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोप ठेवलेची तारीख | ११.०९.२०२५ |
| पुरावा सुरु झालेची तारीख | १५.१०.२०२५ |
| न्यायनिर्णय करीता ठेवलेली तारीख | – |
| न्यायनिर्णय तारीख | ०६.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | – |

**आरोपीविषयी माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामिनावर सुटलेची तारीख | आरोपीत गुन्हा | निर्दोष किंवा शिक्षा | ठोठावण्यात आलेली शिक्षा | खटल्या दरम्यान आरोपी बंदिवासातअसल्याचा कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **रत्नमाला पुनमचंद शिंगाडे** | सुचनापत्रावर सोडले | – | म.दा.का.कलम ६५(ई) | निर्दोष | – | – |

**अभियोग/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**(अ) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | प्रकाश बळीरामजी देवतळे | १८ | पंच साक्षीदार |

**(ब) बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक**

**(क) न्यायालय तर्फे साक्षीदार – निरंक**

## अभियोग/बचाव/न्यायालय निशाणी क्रमांक

(अ) अभियोग पक्षातर्फे निशाणी –

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १९ | पंच सा.क्र.१ ची समंसवरील सही. |
| २. | २० | पंच सा.क्र.१ ची घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही. |

(ब) बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) न्यायालय पक्षातर्फे निशाणी – निरंक

(ड) भौतीक वस्तु – निरंक

## न्यायनिर्णय

(आज दिनांक ०६.०५.२०२६ रोजी घोषित)

१. **आरोपी – रत्नमाला पुनमचंद शिंगाडे**, याचेविरुध्द प्रस्तुतचा खटला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम ६५ (ई) नुसार चालवण्यात आला.

२. आरोपीविरूद्ध नि.क्र.१३ लगत म.दा. अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे दोषारोप निश्चित केले.

३. सदर प्रकरणात आरोपीला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम ६५(ई) मधील गुन्ह्याचा मजकूर त्याच्या बोलीभाषेत वाचून दाखवण्यात आला असता, तो आरोपीने कबूल केला नाही. ज्यावरुन अभियोग पक्षाने सदर प्रकरणात पंच साक्षीदार क्र.१ – प्रकाश बळीरामजी देवतळे (निशाणी क्र.१८) यांची साक्ष सादर केली.

४. निशाणी क्र.२२ खाली आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३

प्रमाणे बयान नोंदविण्यात आले. आरोपीच्या म्हणण्यानुसार तिला सदरच्या केसमध्ये खोटे फसविले आहे.

**५.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकून व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले, त्या कामी कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले –

| <u>**अ.क्र.**</u> | <u>**मुद्दे**</u> | <u>**निष्कर्ष**</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, दि. २७.०९.२०२३ रोजी दुपारी ०१.३० ते ०२.१५ वाजताचे दरम्यान मौजा कोदामेंढी, ता. मौदा येथे आरोपी हा विनापरवाना बेकायदेशिररीत्या देशी ९ निपा कोकण देशी दारू संत्रा ९९९ ची विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असताना मिळून आला ? | **नकारार्थी** |
| २. | आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ साठी</u>** :

**६.** अभिलेखावर आलेल्या मौखिक व कागदोपत्री पुराव्याचे मुल्यांकन करण्यापूर्वी इथे ही बाब नमूद करणे न्यायोचित ठरेल की, प्रचलित न्यायिक तत्व प्रणालीनुसार आरोपीचे कृत्य शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही अभियोग पक्षाची असते. सदरची जबाबदारी अभियोग पक्षाने बचावातील त्रृटी, विसंगती व खोटेपणाचा आधार न घेता सबळ विश्वासार्ह तोंडी व कागदोपत्री पुराव्याने निसंशयपणे व निर्विवादीतपणे

सिध्द करावयाचे असते. अभियोग पक्ष स्वत: ही जबाबदारी पार पाडत नाही तोपर्यंत आरोपी हा कायद्याच्या कक्षेत निष्पाप समजला जातो. आरोपीच्या बचावातील कमकुवतपणाचा फायदा अभियोग पक्षास घेता येणार नाही. जरी आरोपीने आपला बचाव निसंशयरित्या शाबीत केला नाही तरी त्याकारणावरून त्यास शिक्षा देता येणार नाही. आरोपी आपला बचाव अशक्यतेवर दाखवून देऊ शकतो. जर, अभियोग पक्षाच्या खटल्याबाबत संशय निर्माण झाला तर संशयाचा फायदा आरोपीला दिला गेला पाहिजे. तसेच, उपलब्ध पुराव्यावरून दोन परस्पर मत निर्माण होत असतील तर आरोपीच्या बाजूने झुकणारे मत अंगीकारले पाहिजे अशी कायद्याची व्यापक संकल्पना आहे.

७. सदर खटल्यामधे अभियोगपक्षाने पंच साक्षीदार प्रकाश बळीरामजी देवतळे यांची सा.क्र.१ म्हणून नि.क्र.१८ खाली साक्ष नोंदविली आहे. सा.क्र.१ हे घटनास्थळ व जप्ती पंच आहे. सा.क्र.१ प्रकाश यांच्या मौखिक पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक २७.०९.२०२३ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनामाकरिता समंस दिले होते. सदर समंस निशाणी क्र.१९ वर असून त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर त्यांना माहित आहे. त्यावेळेस त्यांच्यासोबत दुसरा पंच शैलेश होता. तसेच, घटनास्थळ व जप्ती पंचनामा त्यांच्या समक्ष तयार केला होता. घटनास्थळ व जप्ती पंचनामा निशाणी क्र.२० वर असून त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर त्यांना माहित आहे. आरोपीला ते ओळखतात.

८. सदर साक्षीदाराच्या साक्षेचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासामध्ये घटनास्थळ पंचनामा करतेवेळेस त्यानी आरोपीच्या घरची टॅक्स पावती किंवा इतर कागदपत्रे बघितले नसल्याचे मान्य केले. त्यानी असे मान्य केले की, घटनास्थळ व जप्ती पंचनामाच्यावेळेस त्याने स्वत:ची अंगझडती दिली नव्हती. त्याने पुढे असे मान्य केले की, पोलीसांसोबत त्याचे दैनंदिन दिवसामध्ये काम पडते व त्यामुळे पोलीस त्याच्या ओळखीचे आहेत व त्यांना तो कामानिमित्त मदत करतो. म्हणून असे दिसून येते की, सदर साक्षीदार हा निष्पक्ष साक्षीदार

नाही. अभियोग पक्षाने सदर साक्षीदारास दुजोरा देणारा पुरावा नोंदविलेला नाही. अशा परिस्थितीत सदर साक्षीदाराची साक्ष ही विश्वासार्ह दिसून येत नाही.

**९.** तसेच, प्रकरणात सी. ए. अहवाल दाखल नसल्यामुळे आरोपीचे ताब्यातुन जप्त केलेला पदार्थ दारुच आहे हे देखील अभियोगपक्षाने सबळ पुरावा देवुन सिध्द केलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर असलेला पुरावा हा आरोपीविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे आरोपी हा संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतो. परिणामी, अभियोगपक्षाने सदर खटला आरोपी विरोधात निःसंशयपणे शाबीत केला असा निष्कर्ष काढता येणार नाही. सबब, वरील विवेचनावरून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे. सबब, वरील बाबीच्या विवेचनेवरून मी मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) आरोपी **रत्नमाला पुनमचंद शिंगाडे**, याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम मधील कलम ६५(ई) मधील गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ नुसार रक्कम रु.१५,०००/– चे नव्याने जामिन कतबा व वैयक्तिक बंधपत्र द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)**

Sd/–
**( एन.के. वानखडे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मौदा.

दिनांक : ०६.०५.२०२६

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 06.05.2026 |
| Order dictated on | : | 06.05.2026 |
| Transcription ready on | : | 06.05.2026 |
| Order checked and signed on | : | 06.05.2026 |

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File are same word to word as per original judgment.

Name of Steno :- T. J. Shende (Grade-III)